## वारस प्रमाणपत्र अर्ज क्र.३०/२०२६ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

( शारदादेवी बापूराव शिंदे वि. कोणी नाही. )
(MHST-1400-0795-2026)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्यासाठी सादर केलेला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन की, अर्जदार यांचे पूर्वहक्कदार दौलतराव सर्जेराव शिंदे हे दि.३१.०७.१९८९ रोजी मयत झाले असून अर्जदार क्र.१ या मयत दौलतराव सर्जेराव शिंदे यांचा मयत मुलगा बापूराव दौलतराव शिंदे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे अर्जदार क्र.१ यांची मुले आहेत व अर्जदार क्र.४ सुमन या मयत दौलतराव सर्जेराव शिंदे यांची मुलगी व अर्जदार क्र.५ मधुकर हा मुलगा आहे. मयत दौलतराव सर्जेराव शिंदे यांच्या पत्नी वच्छला दौलतराव शिंदे यांचे दि.२०.०९.१९९९ रोजी निधन झाले आहे. तसेच मयत दौलतराव सर्जेराव शिंदे यांच्या मुली आशालता शहाजी गायकवाड यांचे दि.१३.०२.२०२० रोजी व रेखा प्रभाकर निगडे यांचे दि.२७.११.२०२४ रोजी निधन झाले आहे. मयत दौलतराव सर्जेराव शिंदे यांची मुलगी आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांना मुलबाळ झाले नव्हते. त्यामुळे त्यांचे हयातीपर्यंत त्यांचा संपूर्ण सांभाळ, सेवासुश्रुषा अर्जदार यांनीच केली होती. अशा परिस्थितीत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे मृत्यूनंतर अर्जदार यांच्या वारसाहक्काच्या नोंदी होण्यासाठी अर्जदार यांनी महसूल अधिकाऱ्यांची भेट घेवून तशा नोंद करण्यासाठी विनंती केली असता त्यांना तसे वारस प्रमाणपत्र आणावे अशी मागणी केली. अर्जदार हे मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत त्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात अर्जदार यांनी दैनिक सकाळ वर्तमानपत्रामध्ये नि.११ प्रमाणे जाहीरनामा प्रसिध्द करुन हरकती मागितल्या. परंतु, आजपावेतो इतर कोणीही हरकत

उपस्थित केलेली नाही. सदर जाहीरनाम्यामध्ये दिलेल्या मुदतीत कोणीही हरकतदार हजर झाले नाही. त्याचप्रमाणे बेलिफ यांनी जाहीर नोटीस बजावलेली आहे. परंतु सदर नोटीसच्या आधारे अर्जदाराचे वारसदाखला मिळण्याबाबतच्या अर्जास कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विनाहरकत, विनाउत्तर राहिले आहे.

**४.** अर्जदार क्र.३ प्रविण बापूराव शिंदे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.०८ दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्र.३ प्रविण बापूराव शिंदे यांनी त्यांचे जादा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. ८ व १२ दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या निशाणी क्र.०८ कडील सरतपासात त्यांच्या अर्जातील कथनाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. सदर प्रकरणात न्यायालयाने अर्जदारास त्यांचे कुटुंबाची वंशावळ देण्यास सांगितले होते. त्याबाबत त्यांनी निशाणी क्र.१२ वरील जादा सरतपासाच्या शपथपत्रामध्ये वंशवळ नमूद केली आहे. सदरचे वंशावळ अर्जदार क्र.३ प्रविण बापूराव शिंदे यांनी दिलेले असून त्यामध्ये सांगितले की, त्यांचे आत्या यांचे निधन त्यांचे गावीच झालेले असून त्यांना त्यांचेव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. त्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे पूर्वहक्कदार आहेत व ते हयात आहेत. ते हिंदू वारसा कायद्यानुसार वर्ग २ चे मुख्य वारसदार आहेत. त्यामुळे अर्जदार यांच्या नावे वारस दाखला देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

**५.** अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयार्थ नि.३ सोबत अर्जदार यांनी नि. १४ वरील दौलतराव सर्जेराव शिंदे यांचे मृत्यू प्रमाणपत्र, नि. १५ बापूराव दौलतराव शिंदे यांचे मृत्यू प्रमाणपत्र, नि. १६ वत्सला दौलतराव शिंदे यांचे मृत्यू प्रमाणपत्र, नि. १७ आशाबाई शिवाजी गायकवाड यांचे मृत्यू प्रमाणपत्र, नि. १८ रेखा प्रभाकर निगडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी नि.१३ अन्वये पुरावा बंद पुरसीस दाखल केली आहे. अर्जदाराने दिलेल्या शपथपत्रानुसार व दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा

प्रभाकर निगडे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे हिंदु वारसा कायद्या अंतर्गत वर्ग २ चे वारस आहेत.

**६.** अर्जदाराचा तोंडी पुरावा व संपुर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, व वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार क्र.१ ते ५ हेच मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या नावाने वारस हक्क प्रमाणपत्र देण्यास कोणतीही अडचण दिसून येत नाही.

**७.** अर्जदार हे भारतीय वारस कायदा १९२५ कलम ३९०, ३७९ तसेच मुंबई प्रांतीक अधिनियमाचे कलम १ व २ अन्वये दाखला मिळण्यास पात्र ठरतात. सदरचा वारस दाखला म्हणजे मालमत्तेच्या मालकी हक्काचा अंतिम निर्णय नाही. हा केवळ मृत व्यक्तीचे मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी दिला जातो. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाही. तसेच अर्जदार हे मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे वारसदार आहेत. म्हणून सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत वच्छला दौलतराव शिंदे, आशालता शहाजी गायकवाड व रेखा प्रभाकर निगडे यांचे वारस असल्याबाबत मान्य करण्यात येते व सदरचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांचे नावे देण्यात यावे.

३. अर्जदारांनी आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक/शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

PRATIBHA SAGAR MULE
Digitally signed by PRATIBHA SAGAR MULE
Date: 2026.08.06 16:46:37 +0530

दिनांक -०६.०८.२०२६

( पी. एस. मुळे )
५ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, फलटण.